प्रेषण प्रमाणपत्र घेऊन

जा.क्र. /पाजिप/ सांप्रवि प्रशा-१/वशी
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद पालघर
दिनांक१५ /०६/२०१६

याद्वारे जिल्हा परिषदेच्या सन्मा.सभासद श्री./श्रीम.------------------------------------------------
------------------------ रा.------------------------------------------------------------------------------------यांना
कळविण्यांत येते की,पालघर जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दि.२१/ ०६ /२०१६ रोजी ११.३० वाजता प्रशिक्षण संकुल ता.पालघर येथे जोडपत्रात उल्लेखिलेले कामकाज चालविणेसाठी भरविणेत येणार आहे.

आपणास सभेस उपस्थीत राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

सचिव
तथा
उपमुख्यकार्यकारी अधिकारी (सामान्य)
जिल्हा परिषद पालघर

अध्यक्ष
जिल्हा परिषद पालघर

प्रत-मा.मुख्यकार्यकारी अधिकारी,जि.प.पालघर यांना माहीतीसाठी
प्रत-मा.अति. मुख्यकार्यकारी अधिकारी,जि.प.पालघर यांना माहीतीसाठी
प्रत-मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,जि.प.पालघर यांना माहीतीसाठी
प्रत-खातेप्रमुख-------------------------
विभागाचे नांव-------------------------
जिल्हा परिषद पालघर

सचिव
तथा
उपमुख्यकार्यकारी अधिकारी (सामान्य)
जिल्हा परिषद पालघर

दिनांक २१/०६/२०१६ रोजी ११.३० वाजता आयोजित केलेल्या स्थायी समिती सभेची विषयसु

विषय क्रमांक-१

दिनांक २४/०५/२०१६ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे, इतिवृत्तावरील कार्यवाही अहवालास मान्यता देणे.

विषय क्रमांक-२

शासनाकडून आलेले शासन निर्णय परिपत्रके ,आदेश , महत्वाची पत्रे इत्यादीचे माहिती खातेप्रमुख ... स्थायी समिती सभेस अवगत करणे बाबत

विषय क्रमांक-३

स्थायी समिती सभेच्या सन्मा.सदस्यांची सभेच्या अनुपस्थितीची रजा मंजूर करणे .

विषय क्रमांक-४

खाते प्रमुख यांच्या विषयांचा आढावा .

विषय क्रमांक-५

जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपयोजना सन २०१६-२०१७ अंतर्गत पशुवैद्यकीय संस्थाना जीवरक्षक औषधाचा पुरवठा करणे या योजनेस जिल्हा परिषद स्थायी सभेची मंजूरी मिळणे बाबत.

विषय क्रमांक-६

जिल्हा वार्षिक योजना बिगर आदिवासी सर्वसाधारण सन २०१६-२०१७ अंतर्गत एकात्मिक कुक्कूट विकास कार्यक्रम या योजनेस जिल्हा परिषद स्थायी सभेची प्रशासकिय मंजूरी मिळणे बाबत

विषय क्रमांक-७

जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपयोजना सन २०१६-२०१७ अंतर्गत अनुसूचित जाती /जमातीच्या कुटुंबाना शेळ्या / मेंढ्याचे गट वाटप या योजनेस जिल्हा परिषद स्थायी सभेची प्रशासकिय मंजूरी मिळणे बाबत

विषय क्रमांक-८

जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपयोजना सन २०१६-२०१७ अंतर्गत पशुवैद्यकीय संस्थाना जीवरक्षक औषधाचा पुरवठा करणे या योजनेस ४६ लक्ष इतकया रक्कमेस व योजनेस जिल्हा परिषद स्थायी सभेची प्रशासकिय मंजूरी मिळणे बाबत

विषय क्रमांक-९

जिल्हा परिषद सेस योजना सन २०१६-२०१७ अंतर्गत ५०% अनुदानावर सुधारित जातीच्या म्हशी वाटप या योजनेस ४० लक्ष इतकया रक्कमेस व योजनेस जिल्हा परिषद स्थायी सभेची प्रशासकिय मंजूरी मिळणे बाबत

विषय क्रमांक-१०

मा.अध्यक्ष,यांच्या मान्यतेने आलेले महत्वाचे विषय आयत्या वेळचे विषय म्हणून स्विकृत करणे

**सचिव**<br>**तथा**<br>**उपमुख्यकार्यकारी अधिकारी (सामान्य)**<br>**जिल्हा परिषद पालघर**

**अध्यक्ष**<br>**जिल्हा परिषद पालघर**

जा.क्र.पाजिप/साप्रवि/प्रशासन-१/वशी /२०१६
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद पालघर
दि. १३ / ०६ /२०१६

प्रति,
श्री./श्रीम-------------------------------------
स्थायी समिती सदस्य, जिल्हा परिषद पालघर
राहणार-------------------------------------
-------------------------------------------

विषय:- दि. २४/०५/२०१६ रोजी स. ११.३० वाजता आयोजित स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

दि. २४/०५/२०१६ रोजी स. ११.३० वाजता स्थायी समिती सभेचे कामकाज संकुल सभागृह पालघर येथे आयोजित करण्यांत आले होते. सदर सभेचे संक्षिप्त कार्यवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत जोडून पाठविणेत येत आहे.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद पालघर

अध्यक्ष
जिल्हा परिषद पालघर

प्रत-१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन नवी मुंबई यांस माहितीसाठी सादर.
प्रत-२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर
प्रत-३. मा.अति .मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर
प्रत-४. मा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जि.प.पालघर
प्रत-५. खाते प्रमुख, (सर्व)---------------------------------
विभागाचे नांव-------------------------------------------जि.प.पालघर

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद पालघर

## दिनांक २४/०५/२०१६ रोजीच्या स्थायी समिती सभेचे संक्षिप्त इतिवृत्त
## भाग १ व २
## नमुना क (नियम ४५)

| सभेची तारीख, वेळ व ठिकाण | उपस्थित सन्मा. सदस्यांचे नांव | उपस्थित असलेले अधिकारी, कर्मचारी व इतर |
|---|---|---|
| दि. २४/०५/२०१६ रोजी स.११.३० वा. संकुल सभागृह पालघर | १. सन्मा. श्रीम.सुरेखा विठ्ठल थेतले<br>अध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर<br>२. सन्मा.श्री. सचिन गजानन पाटील<br>उपाध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर<br>३.सन्मा.श्री. सुरेश ठक्या तरे<br>सभापती, बांध. व आरोग्य समिती<br>४. सन्मा.श्री. धर्मा दावजी गोवारी<br>सभापती, समाजकल्याण समिती<br>५.सन्मा .श्रीम. विनिता विवेक कोरे<br>सभापती, म. व बा. क. समिती<br>६. सन्मा. श्री. अशोक सदू वडे,<br>सभापती, कृषी व पशु संवर्धन समिती.<br>७ . सन्मा.श्री .योगेश बाबूराव पाटील<br>सदस्य,स्थायी समिती<br>८ .सन्मा श्रीम.धनश्री धनंजय चौधरी<br>सदस्या,स्थायी समिती<br>९ . सन्मा. श्री. निलेश रमेश गंधे<br>सदस्य, स्थायी समिती<br>१०.सन्मा. श्रीम.भावना सुधिर विचारे<br>सदस्या,स्थायी समिती<br>११ . सन्मा. श्री प्रकाश कृष्णा निकम<br>सदस्य,स्थायी समिती<br>१२. सन्मा.श्री दिलीप जयराम गाटे<br>सदस्य,स्थायी समिती<br>१३. सन्मा.श्री अशोक सिताराम भोये<br>सदस्य,स्थायी समिती | १. मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जि.प.पालघर<br>२. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जि.प.पालघर<br>३. सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जि.प.पालघर<br>४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जि.प.पालघर<br>५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) जि.प.पालघर (प्रतिनिधी)<br>६. महिला व बाल विकास अधिकारी<br>जि.प.पालघर(प्रतिनिधी)<br>७. कार्यकारी अभियंता बांधकाम<br>जि.प.पालघर<br>८. कार्यकारी अभियंता, लघुपा ट- बंधारे विभाग जि.प.पालघर<br>९. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जि.प.पालघर<br>१०. समाजकल्याण अधिकारी,<br>जि.प.पालघर(प्रतिनिधी)<br>११. शिक्षणाधिकारी (प्राथ.) / (माध्य)<br>जि.प.पालघर<br>१२. जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जि.प.पालघर (प्रतिनिधी)<br>१३.कृषि विकास अधिकारी, जि.प.पालघर<br>१४. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी<br>जि.प.पालघर<br>१५. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना. जिल्हा कार्यक्रम समन्वयक. जि.प.पालघर |

## दिनांक २४/०५/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केलेल्या

# स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

जिल्हा परिषद पालघर स्थायी समितीची सभा दि. २४/०५/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती, सभेच्या सुरवातीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) तथा सदस्य सचिव श्री. प्रकाश देवऋषी यांनी मा. अध्यक्ष , सर्व विषय समिती सभापती, सर्व स्थायी समिती सदस्य,मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे सर्व उपस्थित खातेप्रमुख यांचे स्वागत केले.

यानंतर मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेचे कामकाजास सुरवात करण्याच्या सुचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) तथा सदस्य सचिव यांनी केल्या.

**विषय क्र.१- दि २७/०४/२०१६ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे. व इतिवृत्तावरील कार्यवाही अहवालास मान्यता देणे.**

मागील दि. २७/०४/२०१६ च्या सभेतील विषय, इतिवृत्त कायम करणे यासाठी खालील विषयवार चर्चा मा. अध्यक्ष, यांच्या परवानगीने सुरु करण्यांत आली.

०१. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम यांचा मागील सभेतील प्रश्न,** डोलारा येथील बंधा-याचे काम, तीन वर्ष झाले तरीही अपुर्णच आहे, तेथील पाणी टंचाईमुळे एका आदिवासी महिलेचा विहिरीत पडून मृत्यु झाला होता, सदर बंधा-याचे भुमीपुजन तत्कालीन पालकमंत्री श्री गणेश नाईक यांनी केले होते तेव्हा दोन महिन्यात पुर्ण होईल, असे आश्वासन देण्यात आले होते, चार वर्ष होवुनही काम पुर्ण नाही, मा.पालकमंत्री श्री सवरा साहेबांनी तेथील उप अभियंता,शाखा अभियंता यांना समक्ष बोलवुन १५ दिवसात काम सुरु करण्याचे आदेश दिले होते, आज दोन महिने होवुनही काम सुरु नाही या प्रश्नास लघु पाटबंधारे दिलेले उत्तर-

डोलारा साठवण तलावाचे उर्वरीत काम योजनेच्या सर्वसाधारण आराखडा मंजुरी, सांडवा संकल्पन मंजुरी व साठवण तलाव काटछेद मंजुरी करीता प्रलंबित आहे. सदर मसूदा काम सूरू करणेपूर्वी घेणे अपेक्षित होते. तथापी आता योजनेच्या सर्वसाधारण आराखडयास मा. अधिक्षक अभियंता स्तरावर मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सांडवा संकल्पना करीता मा.अधिक्षक अभियंता मार्फत संकल्पचित्र विभाग, नवी मुंबई कडे शेरेपूर्ततेसह प्रस्ताव सादर केलेले आहे. तसेच सीडीओ, नाशिक येथून साठवण तलाव काटछेद मंजुरी मिळणे करीता प्रस्ताव अधिक्षक अभियंता, ठाणे, मार्फत मा. मुख्य अभियंता, पुणे कार्यालयातून शेरेपूर्ततेसह सीडीओ, नाशिक कडे सादर करण्यात आलेला आहे. सदर मंजु-या अंतिम टप्यात असुन, त्या लवकरात लवकर मिळणेस लघु पाटबंधारे विभाग प्रयत्नशिल आहे.

**मा. अध्यक्ष यांनी वरील संदर्भात बाबत पाठपुरावा करणेच्या सुचना दिल्या.**

सन्मा. श्री. निलेश रमेश गंधे यांनी निदर्शनास आणून दिले की, मागील सभेत मी हजर नव्हतो तरी माझ्या नावांचा उल्लेख इतिवृत्तात व मुद्यांसमोर आला आहे. तरी आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

उप. मु. का. अ. (सामान्य) यांनी सदर बाबत दुरुस्ती करणेची नोंद घेणेत येत आहे असे सांगितले.

०२. **सन्मा. सदस्य श्री. अशोक भोये मागील सभेतील प्रश्न,** पंचायत समितीचे सदस्य जिल्हा परिषदेच्या निधीमध्ये कामे सुचवतात हि बाब योग्य नसुन त्यांनी त्यांच्या पंचायत समितीच्या निधीमधील कामे सुचवावी, अश्या प्रकारे जर जिल्हा परिषद निधीमध्ये त्यांनी कामे सुचवली तरी विभागाने त्यांची कामे विचारात घेवु नये या प्रश्नास लघु पाटबंधारे दिलेले उत्तर-

सर्व सन्मा. पदाधिकारी यांच्या करण्यात आलेल्या मागण्या उपविभागीय अभियंता, विभागीय पातळीवर मा. जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीस सादर करण्यात येऊन मा. जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती मार्फत कामे मंजुर करण्यात येतात. सदर बाब मा. जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

**यावर सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम यांनी सर्व शाखा अभियंता यांना सुचना दयाव्यात असे सांगितले.**

**०३.सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम मागील सभेतील प्रश्न,** ठाणे जिल्हा परिषदेकडे Deposit चा सुमारे २० कोटी रु.चा निधी बाकी आहे. याबद्दल कोकण आयुक्तांनी दोन्ही CEO च्या बैठकीत सुचना दिल्या होत्या, दायीत्व व इतर बाकी निधी ठाणे जिल्हा परिषद देत नसेल तर सर्व सन्मा. सदस्यांनी ठाणे जि,प, मध्ये उपोषण करावयास पाहिजे का.? मा. अध्यक्ष,CEO यांनी या विषयात लक्ष घालावे व निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करावा. या प्रश्नास वित्त विभाग दिलेले उत्तर-

Deposite बाबत बांधकाम विभागाने कार्यवाहि करणे आवश्यक आहे. दायित्व एकत्रित पाठपुरावा अनुषंगाने वित्त विभागाने वेळोवेळी पत्रव्यवहार केला असून सर्व साधारण सभा व स्थायी समिती निर्देश अनुषंगाने परत दि. २१/०३/२०१६ रोजी पत्र दिले आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी . यांनी याबाबत मा. विभागीय आयुक्त यांचेशी चर्चा केली आहे.

**यावर सन्मा.सदस्य श्री. निलेश गंधे यांनी** इतर सबेधित खातेप्रमुख कारवाई करत नाहीत म्हणून नाराजी व्यक्त केली व २१/०३/१६ ला पत्र दिले पण कारवाई काय? अशी विचारणा केली.

**सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी पाणीपुरवठा, पाटबंधारे यांनी कारवाई करणेचे अपेक्षीत असताना काहीही कारवाई करत नाहीत हे निदर्शनास आणून दिले तसेच ही बाब मा.अध्यक्ष मॅडम यांचेकडे मिटींग घेवून पाठपुरावा केला नसल्याचे सांगीतले.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात मा.विभागीय आयुक्त ,मु.का.अ.ठाणे
यांचे सोबत दोन वेळा मिटींग झाल्याचे सांगीतले.व मा. विभागीय आयुक्त यांनी दहा दिवसांची मुदत दिली असल्याचे सांगीतले.

वारंवार पत्र देवून ,मा. विभागीय आयुक्त यांनी कळवून,समक्ष सुचना देवूनही ठाणे जिल्हा परिषदेकडील दायित्व बाकी बाबत दिनांक ८/०६/२०१६ पर्यत कारवाई होत नसेल तर स्थायी समिती सर्व सदस्य जिल्हा परिषद ठाणे येथे ठिय्या आंदोलन करतील असा **ठराव सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे यांनी घेणेच्या सुचना केल्या.** यास सभागृहाने सहमती दर्शविली .

## ठराव क्रमांक-९६

वारंवार पत्र देवून ,मा. विभागीय आयुक्त यांनी कळवून,समक्ष सुचना देवूनही ठाणे जिल्हा परिषदेकडील दायित्व बाकी बाबत दिनांक ८/०६/२०१६ पर्यत कारवाई होत नसेल तर स्थायी समिती सर्व सदस्य जिल्हा परिषद ठाणे येथे ठिय्या आंदोलन करतील या ठरावास ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. निलेश रमेश गंधे**
**अनुमोदक :- श्री. प्रकाश कृष्णा निकम**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**०४.** **का**र्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी आचारसंहिता बाबत माहीती दिली की ,३री नोटीस काढून कारवाई चालू आहे. श्री.गधे यांनी सांगीतले की , टेक्नीकल खाते आहे आचारसंहिता खाली कामे दाबून ठेवता .टेक्नीकल सँग्शन साठी किती मुदत असते सुधारणा अपेक्षित आहे . **सन्मा. सभापती** श्री .वडे यांनी सांगीतले की, बांधकाम विभागाकडील सर्व स्टाप ठाणेकडील जुना आहे.

**सन्मा. उपाध्यक्ष** श्री . पाटील यांनी सांगीतले की, स्टाप माहीतीगार आहे ,ई टेंडर पेपरवर्क पुर्ण करून ठेवावे. ठेकेदारांची कामे फास्ट होतात पदाधिका-यांची कामे प्रलंबित राहतात.

**०५.** **का**र्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी खाजगी संस्था ,व्यक्तींनी केलल्या बोअरवर हात पंप बसविले नसल्याबाबत ग्रामपंचायतीसआवश्यक सुचना देवून कार्यवाही करणची तसेच दक्षता घेणेची सुचना देणेत आल्या आहेत. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी सांगीतले की, भुजल तंत्रज्ञ नेमलेत ते बोअरींगचे दाखले देतात विहीरींचे दाखले देत नाहीत,७०% बोअरिंग व्यर्थ जातात पाणीपुरवठा विभागाचे कोणतेही टेंडर झाले नाहीत. ५ ते ७ दिवसांत मिटींग घ्यावी. त्यावर **कार्यकारी अभियंता** (पाणीपुरवठा) यांनी सदर बाबत कक्ष स्थापन करणेची आवश्यकता असल्याचे सांगीतले.तसेच श्री.गावंडा यांची तक्रार होती म्हणून टेंडर क्लार्क म्हणून घेतले आहे. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी सांगीतले की, जव्हारला दत्ता म्हणून टेंडर क्लार्क आहे त्याची नेमणूक करावी . **सन्मा. सदस्य श्री. अशोक भोये** यांनी तलासरी चे भोये मु.का.अ चे आदेश असताना मान्य करत नसल्याचे सांगीतले तसेच इ टेंडरची सोय सगळया विभागांची सोय एकच ठिकाणी करावी.

**अति.मु.का.अ.** यांनी इंटरनेटचा प्रॉब्लेम वगळता स्वतंत्र ई टेंडरची सोय करणेस हरकत नसल्याचे सांगीतले

**०६.** महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना. —मिटींग बाबत केलेली कार्यवाही काय ? आऊटपुट काय? तसेच ज्या सार्वजनिक विहीरीं तयार झाल्या त्याचे अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव सादर करणेसाठी मोखाडा व जव्हार ग.वि.अ.यांना बोलावून घ्यावे अशा सुचना **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम यांनी** जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना दिल्या. मा.अध्यक्ष यांनी सुचना केली की, केलेल्या कामाची माहीती देणे आवश्यक आहे. गट विकास अधिका-यांवर कोणती कारवाई करणार याची सविस्तर माहीती दयावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचना दिली की ,विहिरीची कामे पुर्ण अपुर्ण किती ? याबाबत माहिती ठेवावी सर्व विहिरींचे अंदाजपत्रके तांत्रिक मंजूरी साठी सादर करणेत यावीत.

**०७.सन्मा. सदस्या श्रीम. भावना विचारे यांनी,** उमरोळी-पंचाळी २६ गाव पाणी पुरवठा योजनेतील पाणी वितरणाबाबत. ५वर्षाचा कालावधी झालेला आहे.उमरोळी पर्यंत पाणी वितरणा बाबत काहीही अडचण नाही . पुढे पंचाळी येथून पाणी वितरणा बाबत अडचणी उदभवत आहेत.आरोग्य धोकेदायक झाले आहे. कधी पर्यंत सुधारणा होईल,आंदोलन केले नाही तर कळनार नाही का ? अशी विचारणा **का**र्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांना केली . **का**र्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी सांगीतले की,पावसाळयापर्यत थांबावे लागेल.एक वर्षा पासून पाठपुरावा चालू आहे.साईट वर जावून पाहणी करतो .त्यावर **सन्मा. सदस्या श्रीम. भावना विचारे यांनी,** तुर्तास काहीतरी व्यवस्था काय करता येईल. **मा.अध्यक्ष** यांनी सदर बाबत लवकरात लवकर कार्यवही करावी अशी सुचना केली.

**<u>वरीलप्रमाणे मागील सभेतील विषयावर चर्चा होवुन सभागृहातील सर्वानुमते दि.२७.०४.२०१६ च्या सभेतील इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.</u>**

**ठराव क्रमांक- ९७**

दिनांक २७/०४/२०१६ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस व इतिवृत्तांवरील कार्यवाही अहवालास हि स्थायी समिती सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. निलेश रमेश गंधे**
**अनुमोदक :- श्री. अशोक सिताराम भोये**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक- २ ऐवजी विषय क्रमांक ३ प्रथम घ्यावा अशी सुचना सचिव तथा उप.मु.का.अ.( सामान्य) यांनी सभागृहात मांडली सभागृहाने यास सहमती दर्शविली.**

**विषय क्रमांक- ३. स्थायी समिती सभेच्या सन्मा.सदस्यांची सभेच्या अनुपस्थितीची रजा मंजुर करणे.**

स्थायी समिती सभेत रजेबाबत एकही अर्ज नसल्याची माहिती, सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांनी माहिती दिली.

**ठराव क्रमांक- ९८**

**दिनांक २४/०५/२०१६ रोजीचे** स्थायी समिती सभेस सन्मा. स्थायी समिती सदस्यांचे अनुपस्थितीबाबत अर्ज प्राप्त नसल्याने रजा मंजूरीचा प्रश्न उदभवत नसल्याबाबत ही स्थायी समिती सभा सर्वानुमते नोंद घेत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी जिल्हा परिषद पालघर येथे नव्याने नेमणुक झालेल्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे स्थायी समिती तर्फे शूभेच्छा देवून स्वागत केले.झाड लावण्याची योजना चांगली आहे. गेल्या वर्षात १.२५ लाख झाडे लावली परंतू २५००० झाडे जगली असल्याचे श्री .निकम यांनी सांगीतले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी स्वत:ची ओळख करून दिली. तसेच स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक ७०४५६६०९११ असा आहे असे सभागृहात सांगीतले. कुपोषण ,पाणी ,टॉयलेट या सगळया योजनांवर विशेष लक्ष देणार असल्याचे सांगीतले.

सर्व खातेप्रमुखांची कार्यालये दुग्धप्रकल्प वसाहत पालघर येथे स्थलांतरीत करावीत ठराव घ्यावा असे श्री. भोये यांनी सुचविले. यासाठी काही तरदुद जिल्हा परिषदेने केली आहे किंवा कसे अशी सभागृहात विचारणा झाली असता पुर्नविनियोजन करून सदरसाठी रक्कम घेता येईल असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सांगीतले .यास सभागृहाने सहमती दर्शविली .

**ठराव क्रमांक- ९९**

सर्व खातेप्रमुखांची कार्यालये दुग्धप्रकल्प वसाहत पालघर येथे स्थलांतरीत करावीत या ठरावास ही जिल्हा परिषद स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. अशोक सिताराम भोये**
**अनुमोदक :- श्री. प्रकाश निकम**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी जिल्हा स्तरीय क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रम असल्याचे सभागृहास निदर्शनास आणले व उपस्थित राहणे बाबत सुचविले. तसेच जिल्हा परिषदेच्या लोगो बाबत माहीती दिली .

संपुर्ण सभागृहाने लोगो बाबत पुढील सर्वसाधारण सभेत विषय घेणेस सुचचिले.तसेच कु.शार्दुल ठाकुर याचा क्रिकेट मध्ये तर कु.पुजा पाटील हिचा शुटर रायफिलीग मध्ये सहभाग असलेने तसा ठराव पुढील सर्वसाधारण सभेत घ्यावा असे सन्मा.सदस्यांनी सुचविले.

रजेवर असणा-या खातेप्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांची परवानगी असते परंतू अध्यक्षांना या बाबत काहीही माहीती नसते. तरी यापुढे आम्हाला याबाबतची माहीती देणेत यावी असे अध्यक्ष मॅडम यांनी सुचविले.

**विषय क्रमांक- ४.**

जिल्हा परिषद पालघरच्या माहे फेब्रूवारी २०१६ च्या मासिक जमा व खर्च तक्त्यास सन स्थायी समिती सभेची मंजूरी घणे.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पुढील प्रमाणे माहीती दिली.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 60 नुसार जिल्हा परिषदेच्या मासिक जमा व खर्चाचे प्रमुख शीर्षवार गोषवारे तयार करुन त्यास स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमुद केलेनुसार माहे फेब्रुवारी 2016 अखेर पालघर जिल्हा परिषदेचा जमा व खर्च झालेला आहे.

| **अ. क्र.** | **निधीचा तपशिल** | **मागील शिलकेसह जमा रक्कम रु.** | **खर्च रक्कम रु.** |
|---|---|---|---|
| 1. | हस्तांतरीत योजना व १३ वा वित्त आयोग | 712,84,75,271 | 522,68,83,912 |
| 2. | अभिकरण योजना | 42,84,99,812 | 22,93,41,246 |
| 3. | जिल्हा परिषद योजना | 19,53,34,093 | 4,51,89,518 |

सदर जमा व खर्चाच्या प्रमुख शीर्षवार तक्त्यास दिनांक 18.04.2016 रोजी झालेल्या अर्थ समिती सभेतील ठराव क्र. 32 नुसार मंजूरी देणेत आली असून, स्थायी समिती सभेच्या मंजूरी करीता शिफारस करणेत आली आहे. सदर जमा व खर्च तक्त्यांस स्थायी समिती सभेची मंजूरी साठी सादर केले आहे. सभागृहाने प्रस्तूत विषयाचे अवलोकन करून मंजुरीबाबम सहमती दर्शविली

**ठराव क्रमांक- १००**

अर्थ समिती सभा दि.18.04.2016 ठराव क्र. 32 दि.18.04.2016 ने मंजूरी दिलेली आहे.तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 60 नुसार पालघर जिल्हा परिषदेच्या माहे फेब्रुवारी 2016 च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यांस ही स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक- ५.**

मा.अध्यक्ष,यांच्या मान्यतेने आलेले महत्वाचे विषय आयत्या वेळचे विषय म्हणून स्विकृत करणे .

**प्रस्तूत विषयी सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी, आजच्या सभेसाठी मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे विभागाकडील एकुण २ विषय आयत्या वेळचे विषय म्हणून प्राप्त झालेले आहेत अशी माहीती दिली.**

| **अ.क्र** | **विभाग** | **विषय** |
|---|---|---|
| १ | **साप्रवि** | जिल्हा परिषद सेस फंड २०१६-१७ जिल्हा पातळीवर क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनास मान्यता देणे बाबत. |
| २ | **पाणीपुरवठा विभाग** | टंचाई कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधन विहीरी पैकी यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप उभारणी साठी दरकरारावर हातपंप संच खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत. |

## ठराव क्रमांक-१०१

**दिनांक २४/०५/२०१६रोजीच्या स्थायी समिती सभेसाठी मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्राप्त झालेले खालील प्रमाणे विभागाकडील एकुण २ विषय आयत्यावेळचे विषय म्हणून**

**स्विकृतीस ही जिल्हा परिषद स्थायी समिती सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.**

| अ.क्र | विभाग | विषय |
|---|---|---|
| १ | **साप्रवि** | जिल्हा परिषद सेस फंड २०१६-१७ जिल्हा पातळीवर क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनास मान्यता देणे बाबत. |
| २ | **पाणीपुरवठा विभाग** | टंचाई कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधन विहीरी पैकी यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप उभारणी साठी दरकरारावर हातपंप संच खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत. |

## ठराव सर्वानुमते मंजुर

**१.** जिल्हा परिषद सेस फंड २०१६-१७ जिल्हा पातळीवर क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनास मान्यता देणे बाबत.

उपमुख्यकार्यकारी अधिकारी,( सामान्य) यांनी माहिती दिली की, जिल्हा परिषद अर्थसंकल्पिय योजना सन २०१६-१७ मध्ये जिल्हा पातळीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा आयोजन करणेकामी रक्कम रु. १०.०० लक्ष तरतुद करणेत आलेली आहे. सदर योजनेमधुन जिल्हा व पंचायत समितीस्तरावरील अधिकारी व कर्मचा-यांच्या क्रिडा स्पर्धा घेणे नियोजित आहे. तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेणे नियोजित आहे.

ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दि. ३१/०१/२०१३ चे भाग २ नुसार सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली असुन जिल्हा व पंचायत समितीस्तरावरील क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७ मे २०१६ रोजी जिल्हा पातळीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा आणि दिनांक २८ मे २०१६ रोजी अधिकारी व कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यास तसेच तांत्रिक मान्यतेतील अटी व शर्तीप्रमाणे खेळाडुंना गणवेश देणे, क्रिडा साहित्य खरेदी करणे, खेळाडुंसाठी भोजन-चहापान व्यवस्था करणे, विजयी खेळाडुंना रोख स्वरुपात बक्षीस देणे याप्रमाणे योजना राबविणेस स्थायी समितीची मान्यता घेण्यास विषय टिपणी सविनय सादर करणेत येत आहे.यास सभागृहाने सहमती दर्शविली.

## ठराव क्रमांक-१०२

**जिल्हा परिषद अर्थसंकल्पिय योजना सन २०१६-१७ मध्ये जिल्हा पातळीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा आयोजन करणेकामी रक्कम रु. १०.०० लक्ष तरतुद करणेत आलेली आहे. सदर योजनेमधुन जिल्हा व पंचायत समितीस्तरावरील अधिकारी व कर्मचा-यांच्या क्रिडा स्पर्धा घेणे नियोजित आहे. तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेणे नियोजित आहे.**

**ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दि. ३१/०१/२०१३ चे भाग २ नुसार सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली असुन जिल्हा व पंचायत समितीस्तरावरील क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७ मे २०१६ रोजी जिल्हा पातळीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा आणि दिनांक २८ मे २०१६ रोजी अधिकारी व कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्याचे सदर योजनेस संबंधित समितीने दिलेल्या प्रारूप मधिल अटी व शर्ती प्रमाणे तसेच तांत्रिक मान्यतेतील अटी व शर्तीप्रमाणे खेळाडुंना गणवेश देणे, क्रिडा साहित्य खरेदी करणे,**

**खेळाडुंसाठी भोजन-चहापान व्यवस्था करणे, विजयी खेळाडुंना रोख स्वरुपात बक्षीस देणे याप्रमाणे योजना राबविणेस ही स्थायी समितीची मान्यता देत आहे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**२.** टंचाई कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधन विहीरी पैकी यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप उभारणी साठी दरकरारावर हातपंप संच खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत.

कार्यकारी अभि. (ग्रा.पा.पु) यांनी पुढील प्रमाणे माहीती सादर केली . टंचाई कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधन विहीरीं पैकी यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप उभारणी साठी हातपंप संच खरेदी करण्यासाठी ग्रा. पा. पु विभागाने केलेल्या दरकरारानुसार मे. विशाल पाईप्स ली. यांचे कडून ३९० हातपंप संच खरेदी करण्यास व त्यासाठी येणारा खर्च रु. ४९,८०,३००/- खर्चास मान्यता देण्याचे अधिकार जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६१ कलम १०५ (ब) नुसार स्थायी समितीस आहेत.सबब प्रस्ताव सादर केला आहे.
यास सभागृहाने सहमती दर्शविली .

**ठराव क्रमांक-१०३**

टंचाई कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधन विहीरींपैकी यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप उभारणी साठी हातपंप संच खरेदी करण्यासाठी ग्रा. पा. पु विभागाने केलेल्या दरकरारानुसार मे. विशाल पाईप्स ली. यांचे कडून ३९० हातपंप संच खरेदी करण्यास व त्यासाठी येणारा खर्च रु. ४९,८०,३००/- खर्चास मान्यता देण्याचे अधिकार जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६१ कलम १०५ (ब) नुसार स्थायी समितीस आहेत. त्यानुसार ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.२ :- शासनाकडून आलेले शासन निर्णय परिपत्रके,आदेश महत्वाची पत्रे इ. माहिती खातेप्रमुख यांनी स्थायी समिती सभेस अवगत करणे व खातेप्रमुख यांच्या विषयाचा आढावा.**

## १) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग :-

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी, माहिती दिली की,** सन२०१५-१६ मध्ये वैयक्तीक शौचालय वार्षिक कृती आराखडयानुसार उद्दीष्ट ३४५१४ होते त्यापैकी १९४९६ एवढे शौचालय बांधून पुर्ण झाले .जिल्हयातील ४७७ ग्रामपंचयतीपैकी माहे मार्च २०१६अखेर १३७ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत व ३४० ग्रामपंचायती शिल्लक आहेत.

सन २०१६-१७ वैयक्तिक शौचालयाचा इष्टांक ३०१३२ असून एप्रिल २०१३ अखेर ९१२ वैयक्तीक शौचालय बांधून पुर्ण झाले आहेत. हागणदारी मुक्ती साठी शिल्लक असलेल्या ३४० ग्रामपंचायतीपैकी सन २०१६-१७ साठी १४१ चा इष्टांक निश्चित करण्यात आला आहे.शासनाने ठरवून दिलेल्या आराखडयानुसार उत्कृष्ट नियोजन केले याबाबत **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी सबंधिताचे अभिनंदन केले व अध्यक्ष,उपाध्यक्ष यांना याबाबत सुचित केले काय ? पैशाची मागणी पुर्ण केली काय ? अशी विचारणा केली.

## २) पशुसंवर्धन विभाग :-

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी माहिती दिली की,** सन२०१५-१६ मध्ये योजनेचा खर्च पुर्ण झाला असून चालू वर्षी निधी नुसार टिएसपी लाभार्थी निवड करणार आहेत. तालुक्यांना आवश्यक सुचना देणेत आल्या आहेत. **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे यांनी** विचारणा केली की,श्री.कदम आहे का? नोटीस काढली का? कारवाई करा. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी विचारणा केली की,पशू संवर्धन दवाखान्यात शिपाई सर्व कामे

करतात,इंग्जेशन देतात डॉक्टर काहीही करत नाहीत बदल होणे अपेक्षित आहे.यावर उपमुख्यकार्यकारी अधिकारी, ( सामान्य) यांनी माहिती दिली की, पशूवैदकिय दवाखान्यात वृणोपचारक म्हणून पद मंजूर असते त्यांचे कामात बदल करता येत नाही. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी सर्व डॉक्टरांनी जुन, जलै मध्ये मुख्यालयी राहणे आवश्यक असल्याचे सांगीतले. **सन्मा. सदस्य श्री. अशोक भोये यांनी** सांगीतले की, औषध किती जनावरांना वापरली, किती शिल्लक राहीली.शिल्लक औषधे जमीनीत पुरून टाकतात. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी सुचना दिली की, साठयाबाबत बोर्ड लावणे आवश्यक आहे.

## ३) ग्रामपंचायत विभाग :-

श्री.अवचार सहा.गटविकास अधिकारी यांनी अहवाल वाचन केले. **उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)** हे यशदा येथे आमचा गांव आमचा विकास प्रशिक्षणास गेले असल्याचे सांगीतले .घरपट्टी, पाणीपट्टी वसूलीची आकडेवारी सादर केली .जनसुविधा कामे २०१० पर्यतची पुर्ण असल्याचे सांगीतले. नागरी सुविधा बाबत माहीती सभागृहात सादर केली . **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी विचारणा केली की, जनसुविधा ९ कामे मंजूरीस पाठविनी असताना ४च कामे का मंजूरी दिली . **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे यांनी** विचारणा केली की नियोजन प्राधिकरण समिती गठीत केली का ? सहा.गटविकास अधिकारी यांनी सदर बाबत उत्तर नाही असे दिले. **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे यांनी** परवानग्या किती सदस्यांना दिल्या ,मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परवानगी दिल्या आहेत असे सांगीतले. **मा.उपाध्यक्ष यांनी** सदरचे प्रस्ताव ग्रामपंचायती मार्फत गेले व समिती प्रमुख पालक मंत्री असतात अशी माहीती दिली .

समिती नसेल आणी परवानगी दिली असल्यास कारवाई करणे अपेक्षित असल्याचे सन्मा.सदस्य यांनी सांगीतले व तसा ठराव घ्यावा अशी सुचना केली.

**ठराव क्रमांक-१०४**

नियोजन प्राधिकरण समिती गठीत केली नसेल आणी परवानगी दिली असेल ,चुकले असेल तर कारवाई तातडीने करणेच्या ठरावास ही स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक- **श्री. निलेश गंधे**

**अनुमोदक- श्री. प्रकाश निकम**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे यांनी** विचारणा केली की, औध्योगीक क्षेत्रातील ग्रामपंचायती आहेत घरपट्टी त्या त्या क्षेत्राप्रमाणे आहे का ? **मा.उपाध्यक्ष यांनी** याबाबत कमिटी नेमा चुकिची घरपट्टी असेल तर कारवाई करणेत यावी.**मा. सभापती,** कृषी व पशुसंवर्धन समिती श्री .अशोक सदू वडे यांनी कमी जास्त घरपट्टी असेल तर तर कारवाई करणेत यावी अशी सुचना केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासन निर्णया नुसार घरपट्टी आकारली जाईल याकडे लक्ष देणेची सुचना केली.

**सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी फ्रि पेस वर टॅक्स लावून देतो असे सांगून ग्रामसेवक पैसे घेतात अशी तक्रार केली. तर **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी श्री.परुळेकर हा ग्रामसेवक काही काम करत नसल्याने त्यांना जिल्हयाचे ठिकाणी बोलवावे अशी सुचना केली. तसेच दलीत वस्तीचे पैसे दिले नसल्याचे निदर्शनास आणले.पेसा पैसे ७०% दिले ३०% पैसे कधी देणार अशी विचारणा केली. सहा.गटविकास अधिकारी यांनी सदर पैसा राज्य शासनाकडून थेट ग्रामपंचायतीला जमा होत असल्याचे सांगीतले.

**४) आरोग्य विभाग :-** प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी अहवाल वचन केले. कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया उद्दीष्टाप्रमाणे ४०% पुणं असल्याचे सांगीतले. **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी प्रश्न केला की,डेंग्यूचे किती रुग्ण सापडले ? प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी उत्तर दिले की ,चार रुग्ण सापडले,

अहवाल आज प्राप्त होईल पाठपुरावा केला आहे.त्यावर **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी विचारणा केली की आरोग्य यंत्रणा काय वाढवीली प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगीतले की, घरोघर जावून दक्षता घेतली .**सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी डॉक्टर रात्री नसतात ,अे, एन,एम नसतातअशी तक्रार केली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यानी किती वेळा व्हिजीट केली असा प्रश्न केला.

**सन्मा. सदस्य श्रीम.धनश्री धनंजय चौधरी** यांनी १०८ गाडी उभी असते पण ड्रायव्हर येण्यास तयार नसतात पेशंट आमच्या कडे येतात कारवाई त्वरीत करणेची सुचना केली. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी पाणी नमुने तपासली जातात का ? असा प्रश्न केला .त्यावर पाणी नमुने तपासणी साठी ठाणे येथे पाठविले जातात असे उत्तर देणेत आले. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी कोणत्या तालुक्यात बालमृत्यू प्रमाण जास्त, कोणत्या तालुक्यात कुपोषण जास्त आहे याचा शोध घेणे आवश्यक आहे असे सांगीतले. कुपोषणा विषयी जास्त लक्ष जव्हार, मोखाडयावर देणेत यावे अशी सुचना केली. **मा. सभापती,** कृषी व पशुसंवर्धन समिती **श्री .अशोक सदू वडे** यांनी बोईसर ग्रामिण रुग्णालय मंजूर झाले परत स्मरणपत्र देणेची सुचना केली. **सन्मा. सदस्य श्री. अशोक भोये** यांनी चांभारशेत प्राथमिक आरोग्य केंद्र काम कुठ पर्यंत आले याची विचारणा केली.

**५) कृषि विभाग :-** कृषि विकास अधिकारी यांनी अहवाल वाचन केले. मागणी नुसार पुरवठा झाला असून सॅपल काढणे काम चालु आहे .जि.प.सेस योजनाअंतर्गत ५०% बियाणे,मिनी साठा उपलब्धता बाबत कृषि विकासअधिकारी यांनी सांगीतले. गेल्या वर्षी फसवणूक झाली यावर्षी व्हायला नको असे **सन्मा. सदस्य श्री.योगेश पाटील यांनी** सुचविले .**सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी सोयाबीन बीयाणे द्यावे अशी सुचना केली.

**६) पाणी पुरवठा विभाग :-** **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी ३६ लाखाच्या पाणीपुरवठा योजना कार्यान्वयीत झाल्या का? उपोषण करणार असे सुचविले यावर प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी विद्युत पुरवठा बाबत अडचणी आहेत , भेटी दिल्या ,ग्रामपंचायतींनी मिटींगा घेतल्या ,ग्रामपंचायतींनी कारवाई करणे अपेक्षित असल्याचे सांगीतले. **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी को को कोलाचे पाणी बंद करा अशी सुचना केली .

त्यावर स्मरणपत्र देवून कार्यवाही करणेत येईल असे उत्तर देणेत आले. **सन्मा. सदस्य श्री.योगेश पाटील** यांनी मायखोप पाणीपुरवठा योजना पुर्ण झाली ग्रामपंचायत कमिटी/समित्यांनी लोकांकडून रु ५००/-प्रमाणे वसुली केली अद्याप पाणीपुरवठा सुरू नाही.ठेकेदार बाहेरचा का आणला,त्याची तपासणी कोण करणार,गावातील नळपाणी योजनेचे पाणी जोडून योजना चालू असल्याचे दाखविले.

समिती वर कारवाई करणेचे अधिकार ,कमीटी बरखास्त करणेचे अधिकार ग्रामसभेस आहेत असे प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले. **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी एकुण किती बोअरींग मारले, किती बोअरींगला पाणी लागले याचा अहवाल पुढील सभेत द्यावा अशी सुचना केली . **सन्मा. सदस्य श्री.योगेश पाटील** यांनी पाण्यात टाकावयाची पावडर कमी जास्त टाकली जाते ,नळाला किडे येतात.म.जि.प्राधिकरणा मार्फत नुतनिकरणाचा प्रस्ताव करतात.कर्मचा-या मार्फत टाकण्यात येणा-या पावडरचे प्रमाण ठरवून द्यावे अशी सुचना केली. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी कारेगांव पाणी पुरवठा योजना इतक्या संथ का?अशी विचारणा केली. **सन्मा. सदस्य श्री.दिलीप गाटे,** यांनी सुचना केली कि रस्ते खोदले आहे पण दुरुस्ती केली नाही.

पेयजल योजनेचा आराखडा कार्यकारी अभियंता यांनी सादर केला. पण वाडा गटातील एकहि नाव आले नसल्याने **सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी विचारणा केली.

प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी सदर यादी शासनाने अंतिम केली असल्याचे सांगितले. मा. उपाध्यक्ष, श्री. सचिन पाटील, यांनी सांगितले कि प्रस्ताव दाखवीणे. तीन दिवसांत प्रस्ताव येणे शक्य नव्हते. procedure सविस्तर सांगावी. **सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी जलयुक्त शिवार अंतर्गत ४९ विहीरींचे प्रस्ताव दिले आहेत. माहिती घेणे व पाठपुरावा करणेच्या सुचना दिल्या.

**७)** **<u>शिक्षण विभाग (माध्य):-</u>** शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी अहवाल वाचन केले. पांजरा हायस्कूल TVM ला भेट दिली. पालघर संच मान्यता तीसरा क्रमांक आल्याबद्दल अभिनंदन ठराव उपाध्यक्ष यांनी मांडला. यास सभागृहाने सहमती दर्शवली.

**ठराव क्रमांक-१०५**

पालघर संच मान्यता तीसरा क्रमांक आल्याबद्दल हि जिल्हा परिषद स्थायी समिती सभा संबंधीत विभागाचे अभिनंदन करत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

८) **<u>शिक्षण विभाग (प्राथ.)</u>:-** शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी अहवाल वाचन केले. ७ मे २०१६ रोजी वाडा येथील शाळांमध्ये ८१२ प्रोजेक्टर मिळाले. वाडा तालुका हा पहिला डिजीटल तालुका झाला या बद्दल सभागृहाने अभिनंदन केले. मा. मु.का.अ. यांनी वाडा येथे प्रोग्रेस झाला तर सर्वच तालुक्यात प्रस्ताव घेण्याची सुचना दिली.

दि. २ मे २०१६ ते १४ जून शिक्षकांना सुट्टीचा कालावधी होता. सदर कालावधीत शैक्षणिक साधन निर्मीती कार्यशाळा घेण्यात आली. संबंधीत केंद्रप्रमुखाचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा अशी सुचना सन्मा. सदस्य यांनी केली. शाळेच्या पहिल्या दिवशी पाठयपुस्तके वितरण केले जाईल, २३ लाख पुस्तकांचा संच मागणी केलेली आहे, सर्व केंद्रप्रमुखांना त्याबाबत सुचना दिलेल्या आहेत तसेच TET परिक्षा १७ जूनला होत आहे अशी माहिती शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी दिली

**ठराव क्रमांक-१०६**

सुट्टीच्या कालावधीत शैक्षिणिक साधन निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली याबद्दल संबंधीत केंद्रप्रमुख यांचे अभिनंदन हि जिल्हा परिषद स्थायी समिती सभा करित आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सन्मा. सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी जिल्हयातील सर्व जि.प.शाळेतील विदयार्थ्यांचा ड्रेसकोड एकच असावा अशी सुचना केली. तसेच चक्रीवादळ झाले अंगणवाडी शाळेचे पत्रे उडाले. १० १५ दिवसांत बांधकाम विभागास कारवाई करण्याच्या सुचना दिल्या.

मा. उपाध्यक्ष यांनी विशेष दुरुस्तीसाठी तरतुद ठेवली पाहिजे अशी सुचना केली. कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी सांगितले कि अंदाजपत्रे करण्याची सुचना दिली आहे. मान्यता दिली तर प्रस्ताव करता येईल.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सांगितले कि, सदर साठी पुर्ननियोजन करुन निधी देता येईल.

**सन्मा. सदस्य श्री. निलेश गंधे** यांनी ६ कोटी शाळा दुरुस्तीसाठी दिले. क्रॉस चेक करण्याची सुचना दिली.

**मा. सभापती,** कृषी व पशुसंवर्धन समिती **श्री .अशोक सदू वडे** यांनी १४ शिक्षकांच्या पगाराचे काय झाले याची विचारणा केली. श्रीम. भावना सुधिर विचारे यांनी बोईसर मराठी शाळा मोडकळीस आली असून कौले काढून घेतले आहे असे सुचित केले आहे. मदयप्राशन करणेसाठी सदर जागेचा उपयोग होत आहे. सदरची शाळा पाडण्याची कारवाई करावी नाहीतर दुरुस्ती करणेबाबत नियमात बसत असेल असा तोडगा काढा.

**सन्मा सदस्य श्री. प्रकाश निकम** यांनी सदर शाळा बसण्यास लायक आहे किंवा नाही याचे प्रमाणपत्र घ्यावे आणि आमदाराकडून पत्र घेऊन आमदार निधीतुन शाळा घ्यावी अशी सुचना केली.

मा. उपाध्यक्ष यांनी सदर ठिकाणी धोकादायक इमारत असा बोर्ड लावण्याची सुचना दिली.

**९)** **<u>महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना:-</u>** जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी अहवाल वाचन केले. ८ तालुक्यांत ५०९ कामे चालू असल्याची माहिती दिली. वैयक्तीक शौचालय विक्रमगड गटाची माहिती दिली.

**१०)** **<u>समाजकल्याण विभाग</u>**:- समाजकल्याण अधिकारी यांनी अहवाल वाचन केले. योजनेच्या यादया प्राप्त झाल्याची माहिती दिली.

**सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी मा. अध्यक्ष**, ,सर्व विषय समिती सभापती, सर्व स्थायी समिती सदस्य, मा. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे सर्व उपस्थित खातेप्रमुख यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने स्थायी समितीची सभा संपल्याचे जाहीर केले.

## दिनांक २४/०५/२०१६ ची स्थायी समिती सभेतील ठरावावरील कार्यवाहीचा अहवाल

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>ठराव क्रमांक</th><th>विभाग</th><th>ठराव</th><th>कार्यवाही</th></tr>
<tr><td>१</td><td>९६</td><td>लेखा</td><td>वारंवार पत्र देवून ,मा. विभागीय आयुक्त यांनी कळवून,समक्ष सुचना देवूनही ठाणे जिल्हा परिषदेकडील दायित्व बाकी बाबत दिनांक ८/०६/२०१६ पर्यत कारवाई होत नसेल तर स्थायी समिती सर्व सदस्य जिल्हा परिषद ठाणे येथे ठिय्या आंदोलन करतील या ठरावास ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>९७</td><td>सा.प्र.वि</td><td>दिनांक २७/०४/२०१६ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस व इतिवृत्तांवरील कार्यवाही अहवालास हि स्थायी समिती सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>९८</td><td>सा.प्र.वि</td><td>दिनांक २४/०५/२०१६ रोजीचे स्थायी समिती सभेस सन्मा. स्थायी समिती सदस्यांचे अनुपस्थितीबाबत अर्ज प्राप्त नसल्याने रजा मंजूरीचा प्रश्न उदभवत नसल्याबाबत ही स्थायी समिती सभा सर्वानुमते नोंद घेत आहे.</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>९९</td><td>बांधकाम</td><td>सर्व खातेप्रमुखांची कार्यालये दुधप्रकल्प वसाहत पालघर येथे स्थलांतरीत करावीत या ठरावास ही जिल्हा परिषद स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>१००</td><td>लेखा</td><td>अर्थ समिती सभा दि.18.04.2016 ठराव क्र. 32 दि.18.04.2016 ने मंजूरी दिलेली आहे.तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 60 नुसार पालघर जिल्हा परिषदेच्या माहे फेब्रुवारी 2016 च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यांस ही स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>निधीचा तपशिल</th><th>मागील शिलकेसह जमा रक्कम रु.</th><th>खर्च रक्कम रु.</th></tr>
<tr><td>1.</td><td>हस्तांतरीत योजना व १३ वा वित्त आयोग</td><td>712,84,75,271</td><td>522,68,83,912</td></tr>
<tr><td>2.</td><td>अभिकरण योजना</td><td>42,84,99,812</td><td>22,93,41,246</td></tr>
<tr><td>3.</td><td>जिल्हा परिषद योजना</td><td>19,53,34,093</td><td>4,51,89,518</td></tr>
</table></td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>१०१</td><td>सा.प्र.वि.</td><td>दिनांक २४/०५/२०१६रोजीच्या स्थायी समिती सभेसाठी मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्राप्त झालेले खालील प्रमाणे विभागाकडील एकुण २ विषय आयत्यावेळचे विषय म्हणूनस्विकृतीस ही जिल्हा परिषद स्थायी समिती सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.</td><td></td></tr>
</table>

22
22
22
22
2
2

(RSA.)

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td>
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विभाग</th><th>विषय</th></tr>
<tr><td>१</td><td>साप्रवि</td><td>जिल्हा परिषद सेस फंड २०१६-१७ जिल्हा पातळीवर क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनास मान्यता देणे बाबत.</td></tr>
<tr><td>२</td><td>पाणीपुरवठा विभाग</td><td>टंचाई कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधन विहीरी पैकी यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप उभारणी साठी दरकरारावर हातपंप संच खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत.</td></tr>
</table>
</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>१०२</td><td>सा.प्र.वि</td><td>जिल्हा परिषद अर्थसंकल्पिय योजना सन २०१६-१७ मध्ये जिल्हा पातळीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा आयोजन करणेकामी रक्कम रु. १०.०० लक्ष तरतुद करणेत आलेली आहे. सदर योजनेमधुन जिल्हा व पंचायत समितीस्तरावरील अधिकारी व कर्मचा-यांच्या क्रिडा स्पर्धा घेणे नियोजित आहे. तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेणे नियोजित आहे.<br>ग्राम विकास विभागाकडील शासंन निर्णय दि. ३१/०१/२०१३ चे भाग २ नुसार सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली असुन जिल्हा व पंचायत समितीस्तरावरील क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७ मे २०१६ रोजी जिल्हा पातळीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा आणि दिनांक २८ मे २०१६ रोजी अधिकारी व कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्याचे सदर योजनेस संबंधित समितीने दिलेल्या प्रारूप मधिल अटी व शर्ती प्रमाणे तसेच तांत्रिक मान्यतेतील अटी व शर्तीप्रमाणे खेळाडुंना गणवेश देणे, क्रिडा साहित्य खरेदी करणे, खेळाडुंसाठी भोजन-चहापान व्यवस्था करणे, विजयी खेळाडुंना रोख स्वरुपात बक्षीस देणे याप्रमाणे योजना राबविणेस ही स्थायी समितीची मान्यता देत आहे.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>१०३</td><td>ग्रा.पा. पुरवठा</td><td>टंचाई कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधन विहीरीपैकी यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप उभारणी साठी हातपंप संच खरेदी करण्यासाठी ग्रा. पा. पु विभागाने केलेल्या दरकरारानुसार मे. विशाल पाईप्स ली. यांचे कडून ३९० हातपंप संच खरेदी करण्यास व त्यासाठी येणारा खर्च रु. ४९,८०,३००/- खर्चास मान्यता देण्याचे अधिकार जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६१ कलम १०५ (ब) नुसार स्थायी समितीस आहेत. त्यानुसार ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>१०४</td><td>ग्रामपंचायत</td><td>नियोजन प्राधिकरण समिती गठीत केली नसेल आणी परवानगी दिली असेल ,चुकले असेल तर कारवाई तातडीने करणेच्या ठरावास ही स्थायी समिती मान्यता देत आहे</td><td></td></tr>
<tr><td></td><td>१०५</td><td>शिक्षण</td><td>पालघर संच मान्यता तीसरा क्रमांक आल्याबद्दल हि जिल्हा परिषद स्थायी समिती सभा संबंधीत विभागाचे अभिनंदन करत आहे.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>१०६</td><td>शिक्षण</td><td>सुट्टीच्या कालावधीत शैक्षिणिक साधन निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली याबद्दल संबंधीत केंद्रप्रमुख यांचे अभिनंदन हि जिल्हा परिषद स्थायी समिती सभा करित आहे.</td><td></td></tr>
</table>

सचिव,
तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद पालघर

सभापती
स्थायी समिती , तथा अध्यक्ष्य
जिल्हा परिषद पालघर